EDUTECH® ACADEMY
NURTURING THE FUTURE...
— Classes 5 to 10 —

# SET B

# N 614

Seat No. | | | | | | | |

**2026 I 04 1100 – N 614 - MARATHI (16) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)**

## (REVISED COURSE)

**Time : 3 Hours** **(Pages 8 )** **Max. Marks : 80**

---

**कृतीपत्रिकेसाठी सूचना :-**

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.
(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.
(३) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्य कता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.
(४) विभाग ५- उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.
(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

**विभाग - १ : गद्य**

**Q.1 (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **7**

प्र. 1. अ. आकृतीबंध पूर्ण करा. (1)

**क्रॉंग्रेस हाऊस जवळ काम मिळण्याचे निकष**

[ ] किंवा [ ]

आ. एका वाक्यात उत्तरे द्या. (1)

i. लेखकाच्या आईला कुठे काम मिळणार असे कळले ?
ii. लेखकाला अर्धवट पेन्सिल का वापरावी लागे ?

कॉंग्रेस हाऊसजवळ काही काम मिळणार आहे, असं समजल्यानं एकदा ती तिकडं गेली. रांगेत उभी राहिली, तशीच ताटकळत; पण त्यावेळी तिला सांगण्यात आलं, की फक्त तिसरी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्यांनाच काम दिलं जाईल. हे ऐकून अर्थातच ती नाराज झाली, घराकडं मागं फिरली. त्याच वेळी तिनं ठरवलं, की 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही.'
तिनं प्रत्यक्षात केलंही तसंच. माझ्यासाठी तिनं घेतलेले कष्ट मी कोणत्या शब्दांतून सांगू? कोरे, पाठकोरे, लिहून उरलेले कागद ती एकत्र जमवायची आणि त्याच्या वह्या करून द्यायची. अखंड पेन्सिल मला मिळणं अवघड होतं. त्यामुळं जेमतेम हातात धरता येईल अशा पेन्सिलनेच लिहावं लागे.

प्र. 2. उत्तरे लिहा : (2)


i. लेखकाच्या आईने लेखकाच्या शिक्षणासाठी कसे प्रयत्न केले ?

ii. आईने मनाशी कोणती गोष्ट ठरवली ?

प्र. 3. ‘मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही.’ या वाक्याचा अर्थ स्पष्ट करा. (3)

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **7**

प्र. 1. अ. आकृतीबंध पूर्ण करा. (1)




आ. बिबळे खूप चतुर असतात कोणत्या प्रसंगावरून कळते ? (1)

ता.२७ मे १९९७, वेळ-सकाळी ६ ते ९.३०, कोळसा परिक्षेत्र, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
आज पहाटेच कोळसावन विश्राम गृहातून बाहेर पडलो.
गावातून टोंगे वनरक्षक आणि त्यांचा सहकारी वनमजूर येताना दिसले. वनरक्षक येताच आम्ही डावीकडं जाणारा झरी रस्ता धरला. समोर चालणारा वनमजूर अचानक थबकला. मी प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं, तर त्यानं रस्त्याकडं बोट रोखलं. नुकत्याच गेलेल्या एका मोठ्या बिबळ्याची ताजी पावलं तिथं उमटली होती. हा एक नर असून आम्ही पोहोचण्याच्या तासाभराआधीच इथून गेला असावा. मी चौफेर पाहिलं; पण मला तरी काही दिसलं नाही.
अचानक मला जंगलाच्या कोपऱ्यावर थोडीशी हालचाल जाणवली. मी सगळ्यांना हातानंच थांबायची खूण केली. दुर्बीण डोळ्यांना लावल्यावर ती हालचाल स्पष्ट झाली. तिथं एका तेंदूच्या झाडाखाली, बांबूमध्ये बिबळा बसला होता; पण त्याचा रंग आसपासच्या परिसराशी एवढा मिसळून गेला होता, की त्याची शेपूट जर हलली नसती, तर तो मला मुळीच दिसला नसता. त्याची पाठ आमच्याकडं होती, त्यामुळे त्यानं अद्याप आम्हांला पाहिलं नव्हतं; पण तेवढ्यात टोंगे वनरक्षकांचा पाय एका वाळक्या काटकीवर पडला आणि ‘कट् ’ असा आवाज झाला. तिखट कानांच्या बिबळ्यानं तो आवाज ऐकताच वळून पाहिलं आणि एकाच झेपेत तो जंगलात अदृश्य झाला.

प्र. 2. एका शब्दात उत्तरे लिहा. (2)

i. बिबळा कोणत्या झाडाखाली बसला होता ?

ii. लेखकाचे विश्रामगृह ?

iii. गावातील वनरक्षकांचे नाव ?


iv. प्रसंग कोणत्या अभयारण्यातील आहे ?

प्र. 3. मानवाच्या जंगलामधील वावर याचा प्राण्यांवर होणारा परिणाम. यावर तुमचे मत सांगा.(3)

**(इ) अपठित गद्य** **4**

**उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

1. आकृतिबंध पूर्ण करा. (2)




पण अगदी साधे, सरळ, सहसा मनाला उपद्रव देणार नाही, असे प्रसन्न संवादसुखही काही माणसांबाबत विनासायास अनुभवता येते. जितकी ओळख कमी, जितके व्यक्तिविषयक संदर्भाचे, तपशिलाचे ज्ञान अपुरे, तितक्या गप्पा अधिक रंगतात. आगगाडीतून प्रवास करताना अशा गप्पांची गोडी साऱ्यांनीच कधी ना कधी चाखलेली असते. पुढयातले माणूस कोण आहे आपल्याला ठाऊक नसते आणि आपण कोण आहोत याची त्याला कल्पना नसते. म्हणजे तसे एकमेकांचे नाव, गाव, व्यवसाय, हुद्दा, पत्ता आपण एकमेकांना विचारून घेतो, पण ती जुजबी ओळख असते. त्यापलीकडचे काहीही दोघांना ठाऊक नसते. त्यामुळे अशा संवादात एक वेगळेच सुंदर मोकळेपण अनुभवायला मिळते. पुन्हा आपण परस्परांना नंतर कधी भेटू अशी भीती किंवा आशाही तिथे नसते. त्यामुळे प्रवासात माणसे किती भरभरून बोलतात. परक्या माणसाजवळ आपणे जेवढे मोकळे होतो, तेवढे जवळच्या माणसापाशी होऊ शकत नाही. परप्रांत, परदेश इथे होणाऱ्या तात्पुरत्या भेटीगाठी आणि त्यांतून उदभवणाऱ्या गप्पा अधिकच सुंदर असतात. मी काही फार प्रवास केलेला नाही, पण लंडनला तीन आठवडे मी होते आणि नंतर अमेरिकेत महिनाभर होते. त्या परदेशप्रवासात अशा क्षणिक परिचयाचे व जवळिकीचे काही हृदय अनुभव मला आले. लंडनमधल्या प्रसिद्ध ब्रिटिश म्युझियममध्ये हिंडता हिंडता पाय दुखू लागले म्हणून पायऱ्यांवर बसले असता, सुसंस्कृत इंग्रज माणूस जरा दूर पायऱ्यांवर येऊन बसला. इंग्रज लोक अबोल, दुरावा राखणारे असतात, असे ऐकले होते म्हणून आपण होऊन त्याच्याशी बोलावे असे धाडस मला करवेना. पण जरा वेळाने तोच माझ्याशी बोलू लागला. माझ्या पोशाखावरून माझे भारतीयत्व त्याने ओळखले असावे. त्यात त्याला वाचनाची खूप आवड होती. मग दोघांचे सूर जुळायला वेळ लागला नाही. डिकन्स, पी. जी. वुडहाऊस, हार्डी हे त्याचे आवडते लेखक होते. माझे वाचन त्याच्याइतके नसले, तरी हे लेखक थोडेबहुत मीही वाचलेले होते. गप्पा खूपच रंगल्या आणि आम्ही जायला निघालो तेव्हा त्याचा निरोप घेताना मन खरोखरच चुटपुटले.


2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (2)

1. अपरिचित व्यक्तींशी संवाद साधताना काय अनुभवायला मिळते?
2. इंग्रज लोक कसे असतात, असे लेखिकेने ऐकले होते?

**विभाग - २ : पद्य**

**Q.2 (अ) कवितेच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.** **8**

प्र. 1. चौकटी पूर्ण करा. (2)



(आ) पानझडीनंतरचे, नवी वस्त्रे धारण करणारे झाड म्हणजे → [ ]

(इ) कवीच्या मते उत्साही आयुष्य म्हणजे → [ ]

(ई) अलगद उतरणारे थेंब → [ ]

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

प्र. 2. खालील ओळींचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा. (2)

i. हसावं कसं सळसळत्या पानासारखं.

ii. जगावं कसं तर? हिरव्या झाडासारखं.

प्र. 3. प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. (2)

i) मुसाफिर   ii) मुकाट   iii) तपश्चर्या   iv) चिंतन

प्र. 4. 'पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं नव्या नवरीसारखं' या वाक्यातील काव्यसौंदर्य स्पष्ट करा. (2)

**(आ) खालील मुदद्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा:** **8**

(i)

| | 'हिरवंगार झाडासारखं' किंवा 'औक्षण' | |
|---|---|---|
| 1. प्रस्तुत कवितेचे कवी/ कवयत्री -<br>2. प्रस्तुत कवितेचा विषय -<br>3. दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ – | 'झाडांच्या पानावरुन वहीच्या पानावर।<br>अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब।।' | 'तुझ्या शौर्या पुढे।<br>त्याची केवढीशी शान।। |
| 4. प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण<br>5. प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा | (i) खुडलेल्या<br>(ii) पालवी<br>(iii) मरगळ<br>(iv) मंज़ुळ | i) औक्षण<br>ii) आसवं<br>iii) तोफ<br>iv) दीन |

**विभाग - ३ स्थूलवाचन**

**Q.3 खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा:** **6**

**(i)** टिपा लिहा.

(अ) बार्क (आ) डॉ. होमी भाभा.

**(ii)** सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वत:च्या कल्पनेने लिहा.

**(iii)** व्युत्पत्ती कोशात शब्दाविषयी कोणती माहिती दिलेली असते ?

**विभाग - ४. भाषाभ्यास**

**Q.4 (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती:**

**(१) खालील वाक्यांचे प्रकार ओळखून लिहा.** **2**

**(i)** तेव्हा तू माझ्याकडे लक्ष दिले होते का ?

**(ii)** शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी खूप काही केले.

**(२) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यात बदल करून वाक्ये पुन्हा लिहा :** **2**

**(i)** वकिलीत मन रमेना. (प्रश्नार्थी करा.)

**(ii)** केशव खूप कंजूष आहे. (उद्गारवाचक करा.)

**(३) दिलेल्या वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा: (कोणत्याही दोन)** **4**

**(i)** निघण्याच्या बेतात असणे

**(ii)** भीक न घालणे

**(iii)** क्षमा करणे

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती:**

**शब्दसंपत्ती-**

**(१) समानार्थी शब्द लिहा:** **1**

झाड =

झोपडी =

**(२) विरुद्धार्थी शब्द लिहा:** 1

शेवट x

श्वास x

**(३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :** 1

पाच कोसांचा परिसर -

**(४) वचन लिहा :** 1

पैसा

दाणा

**(५) लेखननियमांनुसार अचूक शब्द लिहाः** 2

(i) प्रक्रिया / परकीया / प्रक्रीया / परक्रिया

(ii) सर्वाधीकार / सवार्धिकर / सर्वाधिकार / सव्राधिकार

**(६) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करुन वाक्ये पुन्हा लिहा.** 1

(अ) आजी म्हणाली तू लाडू खा

(ब) हो नाही तर काय बसला लटकत जाऊ म्हणतोस ? काका चिडून म्हणाले

**(७) खालील चिन्हांचा नावे लिहा:** 1

,

**विभाग - ५ : उपयोजित लेखन**

Q.5 **(अ) खालील कृती सोडवा** 6

**(१) पत्रलेखन**

**'झाडे लावा ........। झाडे जगवा**

हिररावाई ट्रस्ट, तळेगाव दाभाडे

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त्य

रोपांचे मोफत वाटप

संपर्क - हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगाव दाभाडे

hirwaitrast04@gmail.com

↓

कुणाल /गायत्री पिंगळे, विद्यार्थी प्रतिनिधी, ज्ञानसंपदा विद्यालय तळेगाव दाभाडे या नात्याने

| | |
|---|---|
| शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र ट्रस्टच्या व्यवस्थापकांना लिहा . | चांगल्या उपक्रमाबद्दल हिरवाईट्रस्टचे अभिनंदन करणारे प्रत्र लिहा. |

**किंवा**

**(२) सारांशलेखन**

**विभाग - १ गद्य विभागातील प्र.१ इ मधील अपठित उताऱ्या चा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.** 6

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा:** 10

**(१) जाहिरांत लेखन** 5

**खालील जाहिरात वाचून त्याखाली दिलेल्या कृती करा.**

नवीन सुरु झालेल्या आईसक्रीम पार्लरची जाहिरात करा.

**(२) बातमी लेखन** 5

खालील मुद्दे वाचा व त्याखालील कृती सोडावा.

२८ फेब्रु.

सकाळी ९.० ते ६.०

**सरस्वती विद्यालय**

**शास्त्री नगर, ठाणे**

**विज्ञान दिन सोहळा**

**विज्ञानदिनानिमित्त्य**

**वैज्ञानिक साहित्य प्रदर्शनाचे आयोजन**

**उदघाटक -** राजेंद्र जगताप, जीवशास्त्र प्रमुख, बांदोडकर कॉलेज, ठाणे

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट दिली

**(३) कथालेखन:** 5

मुद्दे: अनाथ मुलगा - रोज सकाळी वर्तमानपत्राचे वाटप - दुपारी शाळेत - रस्त्यात एक पाकीट मिळते - वर्गशिक्षकांकडे देणे - पाकिटावरील पत्त्यावरून योग्य व्यक्तीपर्यंत पोहचवणे - मालकाला आनंद - शाबासकी - मुलाला बक्षीस व त्याच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे.

**(इ) लेखनकोशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** 8

(i) 'मला आवडलेला गणेशोत्सव' या विषयावर पुढील मुद्दे विचारात घेऊन लेखन करा.

| | | |
|---|---|---|
| गावकऱ्यांचा सहभाग | | सुखद अनुभव |
| आनंददायी मिरवणूक व आरास |  | शहरातील गणेशोत्सव |
| घरगुती खाद्य पदार्थ | | गावातील घरगुती गणेशोत्सव |

**(ii)** क्रिकेटच्या बॅटचे आत्मवृत्त:



मुद्दे : मी आता कोप-यात फेकली गेली आहे -- अडगळीच्या कोनाडयात -- काही वर्षांपूर्वी -- कशी तयार झाले? -- कुठे? -- बाजारात इतर मैत्रिणींबरोबर -- त्यावेळचा माझा थाट -- चकचकीत रंग -- आकर्षक रूप -- कॉस्टली केन -- एका लहान मुलाची नजर गेली -- बाबांच्याकडे माझ्यासाठी केलेला हट्ट -- शेवटी दिमाखात त्याच्याबरोबर घरी -- पहिले काही महिने-वर्षे अत्यंत सुखात -- माझी काळजी कशी घेतली गेली? -- नंतर.

**(iii)** **'लॉटरीत मला एक लाख रुपये मिळाले तर !' या विषयावर खालील मुद्द्यांच्या आधारे तुमचे विचार लिहा: 'तिकिट एक रुपयाचं, पण बक्षीस मात्र लाखाचं—पैसेचा नियोजन—पैसेचा महत्त्व—सदुपयोग।**

## ....All The Best....


EDUTECH ACADEMY
NURTURING THE FUTURE....
— SCHOOL SECTION —

**CIDCO BRANCH**
9168 444 999
1ST FLOOR, INFRONT OF BALIRAM PATIL SCHOOL

**HARSUL-SAWANGI BRANCH**
9168 044 999
1ST FLOOR, INFRONT OF PANAD SUPER MARKET